# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

## विशेष कार्य अधिकारी पदाकरीता जाहिरात

जाहिरात क्रमांक:- २९/२०१८

दिनांक :-१७/०७/२०१८

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठात भविष्यात विद्यापीठ शासनाच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानास पात्र होण्यासाठी नॅक(राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषद), बंगलोर कडून मुल्यांकन व अधिस्वीकृती करीता प्रक्रियेचा भाग म्हणुन विद्यापीठात अंतर्गत गुणवत्ता हमी समितीची स्थापना करण्यात येत असून सदर समितीच्या प्रमुख पदी साधारणत: सेवानिवृत्त प्राध्यापक (Professor) किंवा प्राचार्य दर्जाची व्यक्ती कार्यरत असण्याच्या अपेक्षेने सहा महिण्याच्या कालावधी करीता **विशेष कार्यअधिकारी** या पदावर (मानधनावर मानद स्वरूपात) नियुक्ती करावयाची आहे. त्यानुसार संबंधितांकडून सदर पदाकरीता आवेदन अर्ज मागविण्यात येत आहेत.

वरील पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, पात्रतेच्या इतर निकषासंबंधीची तसेच मानधनाबाबतची विस्तृत माहिती आणि अर्जाचा विहीत नमुना विद्यापीठाच्या www.unigug.org या संकेतस्थळावरील Recruitment Tab मध्ये उपलब्ध आहे.

करीता, ईच्छुक अर्जदारांनी जाहिरातीत नमूद सर्वसाधारण सुचनांचे लक्षपूर्वक वाचन करून पात्रतेच्या बाबींची पूर्तता करीत असल्यास विहीत नमुन्यात माहिती भरून आवश्यक दस्तऐवजासह एकुण दोन प्रतीत आपला अर्ज विद्यापीठात दिनांक ०६/०८/२०१८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावा.

दिनांक :- १७/०७/२०१८

कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली


## विशेष कार्य अधिकारी पदाकरीता जाहिरात

जाहिरात क्रमांक :- २९/२०१८

दिनांकः- १७/०७/२०१८

या जाहिरातीव्दारे भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | मानधन/पारिश्रमिक |
|---|---|---|---|
| ०१ | विशेष कार्य अधिकारी | ०१ | सदर पदास वेतन उणे निवृत्ती वेतन किंवा जास्तीत जास्त रूपये ४०,०००/- |

### विशेष कार्यअधिकारी पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय व पात्रतेचे इतर निकष

१. महाविद्यालयातील प्राध्यापक (Professor) किंवा प्राचार्य पदावरून सेवानिवृत्त असलेली व्यक्ती तसेच वयोमर्यादा जास्तीत जास्त ६५ पेक्षा अधिक नसावी.

२. महाविद्यालयातील नॅक मुल्यांकणाबाबत अनुभव किंवा विद्यापीठ प्रशासनाचा अनुभव असल्यास प्राधान्य

३. मराठी/इंग्रजी/हिन्दी भाषेवर प्रभुत्व आवश्यक.

### अर्जदारांसाठी सर्वसाधारण सुचना

उमेदवारांनी आपले अर्ज भरण्यापूर्वी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय इत्यादी बाबी पडताळून पाहाव्यात. तसेच खालील सुचनांचे व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.

१. आवेदकांनी विद्यापीठाच्या www.unigug.org या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यामध्येच टंकलिखित, हस्तलिखीत किंवा संगणकिय प्रिंट केलेला अर्ज(परिपूर्ण भरलेला अर्जाचा नमुना व संबंधीत प्रमाणपत्राच्या स्वसाक्षांकित प्रती) एकुण दोन प्रतीत सादर करावा. विहीत नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये/रकान्यामध्ये कुठलाही बदल करू नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसेच अर्जात योग्य त्या ठिकाणी नमूद करावे.

२. पात्र ठरणाऱ्या उमेदवारास मुलाखतीसाठी स्वतंत्रपणे पत्रव्यवहार केला जाईल.

३. पदासाठी अर्ज सर्व दस्तऐवजासह लिफाफ्यात भरून ---------------------------- या पदासाठी अर्ज असे लिफाफ्यावर लिहून मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, ता. जि. गडचिरोली पिन-४४२६०५ या पत्यावर दिनांक ०६/०८/२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहचेल अशा बेताने पाठवावे.

४. सुवाच्य अक्षरात नसलेले, अपूर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहित नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत नसलेले, वयोमर्यादेत मोडत नसलेले, अर्जासोबत अर्हता, अनुभव, वय, इत्यादी लागू असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित, साक्षांकित/स्वक्षांकित नसलेल्या प्रती, टपालखात्याच्या दिरंगामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उशीरा प्राप्त झालेले, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच सर्व प्रमाणपत्रासह नसलेले अर्ज नाकारण्यात येतील.

५. पात्र ठरणाऱ्या उमेदवारास मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता कुठलाही खर्च देय असणार नाही.

६. जाहिरातीमध्ये बदल किंवा दुरूस्ती करण्याबाबतचा तसेच संपूर्ण जाहिरात रद्द करण्याबाबतचा अधिकार "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली" राखून ठेवीत आहे.

दिनांक :- १७/०७/२०१८
ठिकाण:- गडचिरोली.

कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.